**सामान्य प्रशासन विभागामध्ये “मराठा आरक्षण कक्ष” स्थापन करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: साप्रआ-१५२६/प्र.क्र.१७१/आस्था-१**
मंत्रालय विस्तार इमारत, ५ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २४ जून, २०२६

**प्रस्तावना :**

मराठा समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने विविध योजना घोषित केलेल्या आहेत. या योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२५ अन्वये मा. मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती पुनर्गठित करण्यात आली आहे. सदर उपसमितीने स्वतंत्र “मराठा आरक्षण कक्ष” स्थापन करण्याची शिफारस केली आहे. यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागामध्ये “मराठा आरक्षण कक्ष” स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे प्रभावी सनियंत्रण, मराठा आरक्षणासंदर्भातील न्यायालयीन प्रकरणांचे समन्वयन, मंत्रिमंडळ उपसमितीच्या कामकाजाचे व्यवस्थापन आणि अनुषंगिक कामकाजासाठी सामान्य प्रशासन विभागामध्ये स्वतंत्र “मराठा आरक्षण कक्ष” हे नवीन कार्यासन स्थापन करण्यात येत आहे.

२. मराठा आरक्षण कक्षासाठी उच्चस्तर समितीच्या मान्यतेने पुढीलप्रमाणे पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.एस क्र. | पदनाम | संवर्ग | वेतन स्तर | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अवर सचिव | गट-अ (राजपत्रित) | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| २ | कक्ष अधिकारी | गट-ब (राजपत्रित) | एस-१७ : ४७६००-१५११००<br>एस-२० : ५६१००-१७७५००<br>(चार वर्षांच्या सलग सेवेनंतर अकार्यात्मक वेतनश्रेणी | १ |
| ३ | विधि अधिकारी | गट-अ (राजपत्रित) | एस-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| ४ | सहायक कक्ष अधिकारी | गट-ब (अराजपत्रित) | एस-१६ : ४४९००-१४२४०० | १ |
| | | | **एकूण नियमित पदे** | ४ |
| | | **बाहययंत्रणेद्वारे घ्यावयाचे मनुष्यबळ** | | |
| ५ | डेटा एंट्री ऑपरेटर | -- | -- | **१** |

३. मराठा आरक्षण कक्षामार्फत पुढीलप्रमाणे कामकाज करण्यात येईल:-

१. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठका आयोजित करणे.

२. बैठकीपूर्वी उपसमितीस अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे.

३. मराठा आंदोलकांच्या मागण्या/निवेदनांवर कार्यवाही करणे.

४. मराठा आरक्षणाबाबतची न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

५. सारथी संस्था व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती संकलित करून विश्लेषण करणे.

६. शिष्यवृत्ती, वसतिगृह, परदेशी शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता व इतर लाभांची माहिती संकलित करणे.

७.सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्ग ( SEBC) अधिनियमांतर्गत नियुक्त उमेदवारांची माहिती संकलित करणे.

८. अधिसंख्य पदांवरील उमेदवारांच्या मागण्यांबाबत प्रशासकीय कार्यवाही करणे.

९. इतर प्रशासकीय विभागांशी समन्वय ठेवणे.

१०. मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या कामकाजाचा समन्वय करणे.

४. वरीलप्रमाणे ४ नियमित पदांच्या वेतनाचा खर्च मागणी “ क्र.ए-४ - २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०) सचिवालय (००) (०१) सामान्य प्रशासन विभाग २०५२००२५ (दत्तमत) ०१ वेतन या लेखाशीर्षातून भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय उप समिती तसेच उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक १२.०६.२०२६ रोजीच्या चक्रीय पध्दतीने दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०६२४१८४९०१४३०७ हा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN KASHINATH SHINDE

Digitally signed by KIRAN KASHINATH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=e87a32115497d05a2e91b08062bea862d1d55f490eb311d2f0e47e2fa1faf797, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9FF022F2E9C0F3C0DF2FD6BEE75DF1F6AE3C48080BAD7972572EE58C3F741862, cn=KIRAN KASHINATH SHINDE
Date: 2026.06.24 18:50:40 +05'30'

**( कि. का. शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण), यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,

४. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

५. मा. मंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

६. मा. राज्यमंत्री (सर्व), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,

८. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,

९. मा. लोकसभा/राज्यसभा सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

१०. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व), महाराष्ट्र राज्य,

११. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

१२.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

१३. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,

१४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

१५. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१६. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,

१९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक्स क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०० ०२०,

२०. इंडियन नॅशनल काँग्रेस पार्टी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५,

२१. नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), ठाकरसी हाऊस, बेलार्ड इस्टेट, मुंबई,

२२. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८,

२३. शिवसेना, आनंद आश्रम, श्री भवानी चौक, टेंभी नाका, ठाणे-४००६०१,

२४. बहुजन समाज पार्टी, म.रा., बी.एस.पी. भवन, भुखंड क्र.८३-ए, कलेक्टर कॉलनी चेंबूर, मुंबई-४०००७४,

२५. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राज भवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४०० ००४,

२६. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई,

२७. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८,

२८. सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

२९.सह सचिव (आ.पु.क.) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

३०. निवडनस्ती-आस्था-१, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई